# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक १३९ वा शनिवार दि.२१ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## जगभरात भारतासारखे कोणीही वागले नाही

दिल्ली: खलिस्तानी दहशतवादी हरदीप सिंग निज्जर हत्येवरून गेल्या काही दिवसांपासून कॅनडा आणि भारत यांच्यातील संबंध तणावग्रस्त असल्याचे पाहायला मिळत आहेत. यातच काही दिवसांपूर्वी भारतानेकॅनडाला अल्टिमेटम देत ४१ अधिका–यांना माघारी बोलविण्यास सांगितले होते. यासाठी १० ऑक्टोबरची तारीख देण्यात आली होती. मात्र, यावरून आता कॅनडाचा चांगलाच तिळपापड झाला असून गेल्या ४० ते ५० जगातील कोणताही देश भारतासारखा वागला नाही, असे कॅनडाने म्हटले आहे.कॅनडाचे माजी राजनैतिक अधिकारी यांनी भारताच्या अल्टिमेटमबाबत प्रतिक्रिया देताना टीका केली आहे. गेल्या ४० किंवा ५० वर्षात अशी कोणतीही घटना घडल्याचे मला आठवत नाही. भारताकडून अशा प्रकारे अधिका–यांना माघारी पाठवणे सामान्य गोष्ट नाही, असे कॅनडाच्या माजी राजनैतिक अधिका–याने म्हटले आहे. भारतातील कॅनडाच्या राजनैतिकांची संख्या कमी करण्याची निश्चित तारीख १० ऑक्टोबर होती. पण कॅनडाने भारतासोबत खासगी चर्चेद्वारे हे प्रकरण सोडवण्याचा प्रयत्न केला, पण ही चर्चा निष्फळ ठरली.कॅनडाच्या परराष्ट्र मंत्र्यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, भारताने २० ऑक्टोबरनंतर २१ कॅनडाच्या राजनैतिक अधिका–



यांना सोडून इतर सर्वांचे विशेषाधिकार समाप्त करण्याबाबत माहिती दिली आहे. कॅनडाचे भारतात असलेल्या राजनैतिक अधिका–यांच्या सुरक्षेचा विचार करता, आम्ही भारतातून ते सुरक्षित परततील ही बाब सुनिश्चित करत आहोत. दरम्यान, खलिस्तानी दहशतवादी हरदीप सिंग निज्झरच्या हत्येप्रकरणी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी संसदेत भारतावर गंभीर आरोप केले होते, परंतु कॅनडा पोलिसांनी मात्र निज्झरच्या हत्या प्रकरणात भारताच्या सहभागाबाबतच्या निष्कर्षप्रत पोहोचलो नसल्याचे म्हटले आहे.

## आता चर्चवर हल्ला; अनेकांचा मृत्यू

तेल अवीव : गाझा येथील हॉस्पिटलवर झालेल्या मोठ्या हल्ल्यानंतर आता एका चर्चवरही हल्ला झाला आहे. यामध्ये एक मुलगी आणि महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. पॅलेस्टाईनने या हल्लाला दुजोरा दिला आहे. बॉम्बस्फोटानंतर चर्चमध्ये चेंगराचेंगरी झाली. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. हल्ल्यानंतर लोक हादरले. हमासनेही याबाबत एक निवेदन जारी केले असून इस्त्रायली सैन्याने चर्चला लक्ष्य केल्याचा आरोप केला आहे.गाझा आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, गाझामधील एका चर्चवर बॉम्बस्फोट करण्यात आला, ज्यामध्ये अनेक लोक जखमी झाले. गाझा शहरातील सेंट पोर्फिरियस चर्च या ग्रीक चर्चजवळ हा स्फोट झाला. अनेक लोक जखमी आणि ठार झाल्याचा हमासचा दावा आहे. प्रत्यक्षदर्शींनी वृत्तसंस्थेला सांगितले की, स्फोटामुळे चर्चच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले असून शेजारील इमारत देखील कोसळली आहे.रुग्णालयाजवळ अनेकांचा मृत्यू गाझा शहरातील अल–अहली रुग्णालयावरील हल्ल्यात जखमी झालेल्या लोकांवर उपचार करण्यात डॉक्टरांना अनेक अडचणी येत आहेत. वैद्यकीय साहित्याच्या कमतरतेमुळे त्यांना हॉस्पिटलच्या जमिनीवरच एनेस्थिसीया न देता जखमींवर सर्जरी करावी लागत आहे. इस्त्रायली बॉम्बफेक आणि परिसराची नाकेबंदी दरम्यान झालेल्या या हल्ल्यात रुग्णालयाजवळ आश्रय घेतलेल्या अनेकांचा मृत्यू झाला आहे.डॉक्टरांनी जमिनीवर केली सर्जरी डॉक्टरांनी हॉस्पिटलच्या जमिनीवर आणि हॉलमध्ये सर्जरी केल्या आहेत. बहुतेक सर्जरी एनेस्थिसीया न देता करण्यात आल्या. आम्हाला उपकरणं, औषध, बेड, एनेस्थिसीया आणि इतर गोष्टींची गरज आहे असे अबू सेल्मिया म्हणाले.

## श्री कालिकादेवी मातेची वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते आरती

लातूर / प्रतिनिधी :–शहरातील जुना औसा रोड परिसरातील सद्गुरुनगरमधील श्री कालिकादेवी मंदीरातील श्री कालिकादेवी मातेची आरती विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते पारंपरीक पध्दतीने करण्यात आली. सद्गुरुनगरमध्ये श्री कालिकादेवी मातेचे मंदीर आहे. सर्व भाविक, भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदीरातील श्री कालिकादेवी मातेची आरती विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते दि. १९ ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० वाजता करण्यात आली. यावेळी डॉ. सारिका देशमुख, सौ. जुईली गणेश देशमुख, गणेश एस. आर. देशमुख, माजी नगरसेवक राम कोंबडे, सौ. प्रज्ञा राम कोंबडे, मंदीर समितीचे दीपक दिक्षीत, मुरलीधर दिक्षीत, प्रा. श्रीहरी वेदपाठक, अमोल दैठणकर, प्रदीप अपचुंदेकर, विवेक पंडित, प्रकाश महामुनी, अरुण बारस्कर, शशीकांत खर्डेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री कालिकादेवी मातेच्या आरतीनंतर विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्यासह



सर्व पाहूण्यांचे अमृता दैठणकर, सरीता दिक्षीत, प्रतिभा अपचुंदेकर, मीना बारस्कर, रवी पोतदार, अमोल दैठणकर यांनी स्वागत केले. यावेळी बोलताना विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी सर्व भाविक, भक्तांना शारदीय नवरात्र महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच मंदीर विकासासंदर्भात जे काही काम असेल ती सर्व कामे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख पुर्ण करतील, ते सदैव आपल्या सोबत आहेत. आपणही त्यांना कायम आशिर्वाद द्यावे, असे नमुद केले. यावेळी लातूर जिल्हा सोनार समाज, माता कल्याणी नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीनेही विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन प्रा. श्रीहरी वेदपाठक यांनी केले. यावेळी भाविक, भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कौशल्या अकॅडमीच्या वतीने लातुरात रविवारी धियः प्रचोदयान् कार्यशाळा : वैंशाली देशमुख

लातूर : कौशल्या अकॅडमी लातूरच्या वतीने रविवार, दि. २२ ऑक्टोबर २०२३ रोजी धियः प्रचोदयान् कार्यशाळा व अग्रसंधनी दैनंदिनी प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अकॅडमीच्या संचालिका वैशाली देशमुख यांनी शुक्रवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

विद्यार्थ्यांमध्ये स्वयंप्रेरणा आणि स्वयंशिस्त रुजविण्याकामी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्वाची असते आणि ही कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणाऱ्या सर्वच शिक्षकांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे सांगून वैशाली देशमुख पुढे म्हणाल्या की, रविवारी सकाळी ११ वाजता पडिले लॉन्स या ठिकाणी होणाऱ्या या नाविन्यपूर्ण कार्यशाळेसाठी १५० हून अधिक शाळांचे प्राचार्य – मुख्याध्यापक आपल्या सहकाऱ्यांसह उपस्थित राहणार आहेत. यावेळी खास विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक पध्दतीने तयार केलेल्या व वैदिक अभ्यास पध्दतीने प्रेरित असलेल्या अग्रसंधनी दैनंदिनीचा प्रकाशन सोहळा पार पडणार आहे. या कार्यशाळेसाठी आ. अभिमन्यू पवार, आ. विक्रम काळे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पुण्याच्या एम.ए. रंगूनवाला डेंटल कॉलेजच्या एचओडी डॉ. श्रीमती रेणुका नागराळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. लहान मुलांवर अगदी लहानपणांपासून स्वच्छतेसह अनेक बाबींची शिस्त लावणे त्यांचे प्रबोधन करणे गरजेचे असते. चांगला विद्यार्थी घडविण्यासाठी विद्यार्थ्याला नेमके कसे शिकवणे, समजावणे आवश्यक आहे, हे महत्वाचे असते. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याला शिकवलेले अंगवळणी पडले तरच त्या शिक्षणाला अर्थ राहणार आहे. रविवारी सकाळी अकरा वाजता अंबाजोगाई रोडवरील साळाई मंगल




कार्यालयाजवळील पडिले लॉन्स या ठिकाणी ही कार्यशाळा व अग्रसंधनी दैनंदिनीचा प्रकाशन सोहळा संपन्न होणार असल्याचे वैशाली देशमुख यांनी सांगितले. याप्रसंगी कौशल्या अकॅडमीचे संचालक विजय केंद्रे, प्रा. श्रीपाद कुसनूरकर, प्रा. चंद्रकांत विभूते आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## केस मागे घेण्यासाठी माझ्यावर दबाव

नवी दिल्ली : तृणमूल काँग्रेसच्या फायरब्रँड खासदार महुआ मोईत्रा या अदानींबाबत संसदेत प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतल्याच्या आरोपामुळे चांगल्याच अडचणीत आल्या आहेत. दरम्यान, महुआ मोइत्रांचे माजी मित्र आणि सुप्रीम कोर्टातील वकील जय अनंत देहाद्राई यांनी एक गंभीर आरोप केला आहे. सीबीआयकडे दिलेली तक्रार आणि भाजपा खासदार निशिकांत दुबे यांना लिहिलेले पत्र मागे घेण्यासाठी आपल्याला भाग पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला, असे त्यांनी म्हटले आहे. देहाद्राई यांनी आज त्यांच्या अधिकृत ट्विटर हँडलवर लिहिले की, काल दुपारी माझ्यावर हेन्रीच्या बदल्यात निशिकांत दुबे यांना देण्यात आलेली सीबीआय तक्रार आणि पत्र मागे घेण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र मी असे करण्यास स्पष्टपणे नकार दिला आहे. तसेच मी याची माहिती सीबीआयला देणार आहे.देहाद्राई यांनी सांगितले की, मेसेंजर पूर्णपणे निर्दोष आहे. मात्र तुम्हाला त्याच्याबाबत सर्व काही सांगणार आहे. महुआ मोइत्रा आणि



देहाद्राई यांच्यामध्ये त्यांचा पाळीव कुत्रा हेन्रीवरून वाद सुरू आहे. दरम्यान, तृणमूल काँग्रेसमधील सूत्रांनुसार गेल्या सहा महिन्यांमध्ये मोईत्रा यांनी कथित गुन्हेगारी अतिक्रमण, चोरी, अश्लील संदेश आणि गैदवर्तनावरून देहाद्राईंविरोधात पोलिसांकडे अनेक तक्रारी नोंदवल्या आहेत. यादरम्यान, भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी सांगितले की, त्यांना वकील देहाद्राई यांचे एक पत्र मिळाले आहे. त्यामधून त्यांनी संसदेत प्रश्न विचारण्यासाठी महुआ मोईत्रा यांनी उद्योगपती दर्शन हीरानंदानी यांच्याकडून रोख आणि भेटवस्तूंच्या रूपात लाच घेतल्याचे काही पुरावे सादर केले आहेत.

## विविध विकास कामाच्या भुमिपूजन प्रसंगी आ. रमेशआप्पा कराड यांची ग्वाही

लातूर : – लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील जवळपास साठ ते सत्तर टक्के मंदिराचा विकास माझ्या आमदार निधीतून होत आहे याचा मनस्वी आनंद असून येत्या काळात पानगावचे ग्रामदैवत पन्नगेश्वर या मंदिराचाही सर्वांगीण विकास करू अशी ग्वाही भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

पानगाव येथील रेणुका देवी मंदिर परिसरात २५ लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात येणाऱ्या सभामंडपाचे भूमिपूजन, जिल्हा वार्षिक नियोजन योजनेतून ७ लक्ष रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरातील खुल्या व्यायाम शाळेचा शुभारंभ आणि रामनगर परिसरातील हनुमान मंदिरासमोर सात लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात येणाऱ्या सभागृहाचे भूमिपूजन भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते गुरुवारी सायंकाळी करण्यात आले. याप्रसंगी भाजपाचे लातूर ग्रामीण विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, संगायोचे अध्यक्ष वसंत करमुडे, सतीश आंबेकर, सुकेश भंडारे, अमर चव्हाण, भागवत गीते, सुंदर घुले, दत्तात्रय कस्तुरे, अँड. माधव गुडे, रमाकांत संपत्ते, अनुसया फड, शीला आचार्य, ललिता कांबळे, मारुती गालफाडे, नाथराव गिते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते रेणुका देवीची विधिवत पूजा करून आरती केली. मिळालेल्या संधीच सेवेत रूपांतर करणे गरजेचे असते. मतदार संघात सर्वाधिक माझा निधी पानगावला दिला असे सांगून आ. कराड यावेळी बोलताना रेणुका देवी मंदिराच्या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही देवून सभागृहाचे काम अत्यंत चांगल्या पद्धतीने पूर्ण करावे अशा सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी दिल्या. अवघ्या पंधरा दिवसात दिलेला शब्द पाळला आणि प्रत्यक्ष कामाचे भूमिपूजन होत असल्याने रेणुका देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बालाजी बचेवार आणि



नवरात्र उत्सव समितीचे अध्यक्ष दत्ता रामरुळे यांनी त्यांच्या सहकाऱ्यासह यथोचित सत्कार करून आ. रमेशआप्पा कराड यांचे जाहीर आभार व्यक्त केले हनुमान मंदिर सभागृह भूमिपूजन

पानगाव येथील रामनगर परिसरात असलेल्या हनुमान मंदिरासमोर सात लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात येणाऱ्या सभागृहाचे भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते गुरुवारी करण्यात आले. राम मंदिर परिसरात नागरिकांच्या मागणीनुसार हनुमान मंदिर सभागृह बांधकामासाठी आ. रमेशआप्पा कराड यांनी आपल्या स्थानिक विकास आमदार निधी अंतर्गत सात लक्ष रुपये मंजूर केल्याबद्दल त्या परिसरातील नागरिकांच्या वतीने सदरील सभागृहाच्या भूमिपूजन निमित्ताने आ. रमेशआप्पा कराड यांचे फटाके फोडून जीसीबीद्वारे फुले उधळून जोरदार स्वागत करण्यात आले.

खुल्या व्यायाम शाळेचे उद्घाटन

जिल्हा वार्षिक नियोजन योजनेतून सात लक्ष रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या पानगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरातील खुल्या व्यायाम शाळेच्या शुभारंभ भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य अधिकारी चंद्रकांत बडे, विश्वजीत भोसले, आरोग्य कर्मचारी जना सूर्यवंशी, रंजना इंदापुरे, सय्यद शबाना, जयश्री थोरमोठे, राहुल जाधव, नेहा कांबळे, अशितोष पवार, जयदीप आचार्य, गणेश बन, जयमला रायनूळे यांच्यासह महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पानगाव येथील आ. रमेशअप्पा कराड यांच्या उपस्थितीत झालेल्या विविध कार्यक्रमास मुन्ना साबदे, संतोष तुरुप, परमेश्वर बरुळे, रामभाऊ भंडारे, राम पाडिले, नवनाथ चेगे, शैलेश हरिदास, अनिल धर्माधिकारी योगीराज शिरसाट, दत्ता आंबेकर, अजित कस्तुरे भाऊसाहेब शिंदे बाबुराव कस्तुरे, रंजना गालफाडे, कार्तिक गंभिरे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी रामनगर आणि परिसरातील नागरीक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

### क्रिकेटच्या चर्चेत राजकारण आहे, आणि काळाबाजारसुद्धा

असे का होते आहे, याचा विचार सत्ताधारी पक्षाने करून भारत–पाकिस्तान सामन्याच्या तिकिटविक्रीची चौकशी 'ईडी' वा अन्य यंत्रणेमार्फत करणे आवश्यक आहे ज्युलिओ एफ. रिबेरो पाकिस्तानातून जो क्रिकेट संघ सध्या भारतात विश्वचषकाच्या एकदिवसीय सामन्यांसाठी आला आहे, त्यात लक्षणीय खेळाडू अजिबात नसूनसुद्धा या संघाची चर्च अधिक दिसते. ती कशी आणि त्यातून काय उत्पात घडले, याबद्दल ऊहापोह करण्याआधी क्रिकेटप्रेमींसाठी एक वाईट बातमी : आजही आपल्या आसपास, क्रिकेट न पाहणारे लोक आहेत उदाहरणार्थ आमच्याकडे घरकाम करणारी मेरी. पलीकडच्या खोलीतील टीव्हीवरून येणारे आवाज कुठल्यातरी सामन्याचे आहेत हे तिला स्वयंपाकघरातूनही समजते; पण सामना म्हणजे फुटबॉलचाच, असे तिला वाटते!'वेस्ट इंडीज म्हणजे क्रिकेट आणि क्रिकेट म्हणजे वेस्ट इंडीज' असे वेस्ट इंडीजचे महान लेखक व्ही. एस. नायपॉल यांनी सुमारे पन्नास वर्षांपूर्वी लिहिले होते. या कॅरिबियन बेटांनी जेव्हा 'व'च्या बाराखडीतल्या वॉरेल, वीक्स आणि वॉलकॉट या तिघा महान क्रिकेटपटूंची जादू पसरवली, तेव्हाचा तो भारलेला काळ! क्रिकेटचा तितका जोश आता तिथे नाही. भारतीय उपखंडाने वेस्ट इंडिजला उंच फटके मारून बाहेर काढले आहे एकेकाळी इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाऐवजी वेस्ट इंडीजने क्रिकेटसत्ता म्हणून नाव कमावले होते, ते पद आता भारताकडे आहे. भारतालाही क्रिकेटचा इतिहास आहेच. रणजी ट्रॉफीला ज्यांचे नाव देण्यात आले आहे ते सौराष्ट्रातल्या नवानगर संस्थानचे महाराजा रणजीतसिंहजी हे 'एका लहानशा राज्याचे संस्थानिक, पण महान खेळाचे महाराज' आ–हेत, असे ब्रिटिश पत्रकार ए. जी. गार्डिनर (हे 'अल्फा ऑफ द प्लाउ' या टोपणनावाने लिहीत) यांनी म्हटले होते. रणजितसिंहांनंतरचे भारतीय क्रिकेट हे 'क्रिकेट विथ विजय मर्चंट' होते. अनेकांना मर्चंट हे भारताचे कर्णधार म्हणून माहीत असतील. मुंबईकर विजय मर्चंट हे एरवी एक कापडगिरणी चालवत होते हे जरी फारजणांना माहीत नसले तरी 'सभ्य क्रिकेटर' म्हणून ते अनेकांना आठवत असतील.क्रिकेटमधले राजकारण क्रिकेट हा आता 'सभ्य गृहस्थांचा खेळ' राहिलेला नाही. प्रतिभावान खेळाडूंसाठी क्रिकेट हाच व्यवसाय असू शकतो, जिथे खरोखर प्रतिभावान आणि अर्थातच शिस्तबद्ध असल्यास चांगले फायदेशीर जीवन जगता येते. नैसर्गिक प्रतिभेचा शोध घेणारे क्रिकेटदर्दी अनेक आहेत आणि जुन्याजाणत्या खेळाडूंतर्फे चालवल्या जाणाऱ्या अकॅडमींमधून अशा प्रतिभेचे पा–लनपोषणही होत असते. हा खेळ आबालवृद्धांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाला असल्याने, पैशाचा तोटा नाही.आणि जिथे पैसा आहे तिथे राजकारणीही मागे राहात नाहीत. अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि भावी मुख्यमंत्री राज्य क्रिकेट मंडळांच्या अध्यक्षपदापर्यंत पोहोचले आहेत. हे पदाधिकारी लोक कधी गांभीर्याने क्रिकेट खेळले होते का, की फक्त गल्लीक्रिकेट, सॉफ्ट–बॉल क्रिकेट एवढ्यावरच त्यांची मजल होती हे कुणाला माहीत नाही. तरीही, ते राजकारणातून वेळ काढून आपापल्या परीने क्रिकेटची 'सेवा' करत राहातात कारण यातून त्यांचा प्रभाव पसरवण्याची संधी मिळते आणि भरपूर निधीचा मेवाही मिळू शकतो! रॉजर बिन्नी हा सालस, शांत अँग्लो–इंडियन अष्टपैलू खेळाडू १९८३ मध्ये कपिलदेवच्या नेतृत्वाखाली विश्वचषक जिंकणाऱ्या संघात होता, तो पुढे अनेकांच्या विस्मृतीतही गेला आणि बेंगळूरूमध्ये राहू लागला. पण बिन्नी यांना क्रिकेटजगतातील सर्वाधिक श्रीमंत, सत्त–ावान अशा 'बीसीसीआय'च्या अध्यक्षपदी नेमण्यात आले. तरीही भारतीय क्रिकेटचे निर्विवाद नियंत्रक म्हणून या 'बीसीसीआय'चे सरचिटणीस जय शाह यांचेच नाव घेतले जाते. त्यांचे वडील देशातील दुसऱ्या क्रमांकाची महत्त्वाची व्यक्ती आहेत. तर जय शहा हे देशातील क्रिकेटक्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आहेत. अमित शाह हे नुकत्याच झालेल्या भारत–पाकिस्तान सामन्यास प्रेक्षक म्हणून आले होते. तेवढेच चार विसाव्याचे क्षण त्यांना मिळाले असतील. त्यातही ते सपत्नीक आणि लहानग्या नातीलाही घेऊन आले होते, ही सोबत त्यांना एरवीच्या राजकीय धबडग्यात ज्यांच्या–ज्यांच्यासह असावे लागते, त्या तुलनेत सुखदच म्हणावी अशी! हा सामना पाहावयास आलेल्या समस्त १.२० लाख प्रेक्षकांच्या– यापैकी बहुतेकजण जेव्हा केव्हा जिथे कुठे निवडणुका होतील तिथे मतदानही करणारच असतील म्हणून एवढ्या मतदारांच्या– स्मृतीत अमित शहा यांची उपस्थिती कोरली गेली असेल. फक्त तिथे उप–स्थित असलेलेच नव्हे तर टीव्हीवरून हा सामना पाहणारे लक्षावधी लोकही अमित शहांना पाहात होते कधी ना–तीला मांडीवर घेताना, कधी तिला शेजारी बसवल्यावर तिचे हात नीट ठेवताना! या सामन्यात भारतीय संघाने दणदणीत विजय मिळवला, तोही ज्या स्टेडियमला दिलेले वल्लभभाई पटेलांचे नाव बदलून 'नरेंद्र मोदी स्टेडियम' असे करण्यात आले त्या क्रीडागारात मिळवला, याचे करायचे तेवढे भांडवल भाजपची प्रचारयंत्रणा करेलच. हांगझो येथील आशियाई खेळांमध्ये भारतीय पथकाने शंभराहून अधिक पदके मिळवली. याचेही श्रेय मोदींना मिळेलच. भाजप हा आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी जे केले नाही ते करून दाखवणारा पक्ष ठरतो आहे आणि हे विधान अगदी वैचारिक विरोधक, टीकाकार तसेच राजकीय विरोधी पक्षांतील नेते यांच्या अटकांना सुद्धा लागू आहे. आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी– पारतंत्र्यकाळातल्या ब्रिटिशांचा अपवाद वगळता– टीकाकारांना आणि राजकीय विरोधकांना एवढ्या मोठ्या प्रमाणात आणि एवढ्या नित्यनेमाने गजांआड केले नव्हते , हे मी ९४ वर्षांचे आयुष्य जगल्यानंतर स्वत:च्या माहितीनुसार सांगू शकतो आहे.असो. क्रिकेटबद्दलच बोलायचे तर, यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत काही लक्षात राहण्याजोगे निकाल आले. इंग्लंड ही क्रिकेटची जननी, पण अननुभवी, नवख्या अफगाणिस्तानपुढे इंग्लंडचा पराभव झाला.

# भारतीय संवीधानाची प्रासंगीकता

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. जगातील सर्वात मोठी राज्य घटना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला दिली आहे. भारतात अनेक जाती, धर्म, पंथ, वंश, समुदाय, गोत्र, भाषा राहणीमान, प्रांत असतांना सुद्धा सर्वांना भारतीय राज्य घटनेने एका सूत्रात बांधून भारतीय लोकशाही प्रणाली बहाल केली आहे. सांसदीय लोकशाहीचे भवितव्य विषद करताना लोक नितीमान असणे ही पूर्वअट आहे. वर्तमानातील लोक नितीमान नसल्यामुळे राजकीय साक्षर किंवा राजकीय दृष्टी नसल्यामुळे तसेच काही लोकांच्या महत्त्वाकांक्षी धोरणात हिरवा राष्ट्रवाद किंवा भगवा राष्ट्रवाद असल्यामुळे आणि या तत्त्वज्ञानाची पाळेमुळे खोलवर रुजविण्यासाठी त्यांच्या सांस्कृतिक तत्त्वाला अडसर असणारी सांसदीय लोकशाही आणि संविधान त्यांना नको आहे. अशी विच–ारसरणी असलेल्या लोकांचा आरंभापासूनच भारतीय संविधानाला विरोध आहे. म्हणूनच या ना त्या कारणाने भारताच्या संविधानांतर्गत सांसदीय लोकशाहीवर अनेक स्तरातून आक्रमणे होताना दिसून येतात. त्यामुळे भारतात धर्म, भाषा, पैसा, पक्ष व प्रदेश वादाची भावना प्रज्वलित करण्यात येथील प्रसार माध्यमे अग्रेसर आहेत.

भारतीय संविधानात प्रत्येक माणसाला त्याच्या इच्छेप्रमाणे धर्म स्वीकारण्याची व बदलण्याची मुभा दिलेली आहे. भारतीय संविधानात वेळ प्रसंगी कायद्याच्या कलमांमध्ये बदल करण्याचा अधिकार ही दिलेला आहे. संविधानाची अंमल बजावणी जर यथायोग्य झाली तर या देशाचे कल्याणच होईल. पण भारतात हजारो वर्षापासून ब्राह्मणी वर्ण व्यवस्थेचा पगडा असल्यामुळे जैन, ख्रिश्चन, मुसलमान, इसाई, शिख व अन्य धर्म, पंथ यांची ही मानसिकता हिंदु धर्माला पोषक आहे. या देशात बौद्ध धम्म आणि हिंदू धर्म यांचा संघर्ष हजारो वर्षापासून चालतच आहे आणि पुढे ही असाच चालू राहणार आहे.

आज या देशात भ्रष्टाचारामुळे सत्ताधारी आणि त्यांचे हित चिंतक अधिक श्रीमंत होताना दिसत आहेत आणि गरीब अधिक गरीब होताना दिसत आहेत. सांसदीय लोकशाही प्रणाली आजही धोक्यात आलेली आहे. खासगीकरण, बेरोजगारी महागाई, यांनी तर कळसच गाठला आहे. म्हणून लोकशाहीला वाचविण्या करिता सामान्यातील सामान्य माणसाने आपल्या शरी–रातील रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत लढायला पाहिजे. आपले संविधान ही असेच.. तुमचा विश्वास नसला तरी काम करत रा–हील. त्यामुळेच ते उपयुक्त ठरत राहील. भारताचे संविधान म्हणजे केवळ त्यातील शब्द नव्हेत, तर या देशातील व्यक्ती केंद्रस्थानी मानून, स्वातंत्र्य आणि समतेची आस धरणारा एक जिवंत दस्ता–वेज आहे.. संविधानाची पायाभूत मूल्ये न्याय पालिकेने जप–लीच; पण ती लोकांमध्ये नागरी समाजात ही रुजायला हवीत.

रोशन खोब्रागडे
९६०४८२४७६०

# पोलंडमधील पहाट!

आर्डर्नबाईंची राजवट अनेक मुद्द्यांसाठी महत्त्वाची होती. करोनाकाळात दाखवलेली कार्यक्षमता, धर्माभिमान्यांच्या नृशंस हल्ल्यानंतरचे औदार्य यामुळे आर्डर्न यांचे जागतिक स्तरावर कौतुक झाले. युरोपीय देशांसाठी पोलंडमधील सत्तांतर महत्त्वाचे आहेच, पण 'मतपेटीद्वारे हुकूमशाही' स्थापन करण्याचा प्रयत्न पोलिश जनतेने रोखला, हे जगासाठी स्वागतार्ह.. सरकारी माध्यमांचा कमालीचा दुरुपयोग, न्यायव्यवस्थेसह सर्व नियामक यंत्रणांची मोडतोड, अध्यक्षपदावर आपल्या 'बोलक्या बाहुल्या'ची नियुक्ती, सर्वच महत्त्वाच्या नेमणुकांत कार्यक्षमतेपेक्षा निष्ठांस महत्त्व देणे आणि या सगळ्याच्या हातात हात घालून येणारा अवगुण म्हणजे लोकशाहीचा संपूर्ण संकोच. हे सारे वर्णन मध्य युरोपातील मोक्याच्या अशा पोलंड या देशातील सरकारचे. गेल्या आठवड्यातील निवडणुकांत पोलंडमधील उजव्या सरकारास सत्ता हाती राखण्यात अपयश आले. हंगेरी, काही प्रमाणात इटली, टर्की आदी देशांतील राजकारणाने घेतलेल्या उजव्या वळणाच्या पार्श्वभूमीवर पोलंडमधील निवडणुकांत काय होते याकडे सारे जग नाही तरी निदान युरोप खंड डोळे ला–वून बसला होता. गेल्या आठ वर्षांपासून या देशातील असहिष्णू, प्रतिगामी आणि म्हणून देशास मागे नेत असलेले सरकार पुन्हा एकदा बहुमताने सत्तेवर येणार की पोलिश मतदार आपल्या देशा–तील हे दु:स्वप्न संपवणार हा प्रश्न युरोपसाठी महत्त्वाचा होता. याचे कारण जर्मनी, फ्रान्स आदी देशांत पुन्हा एकदा धर्मवादी शक्ती मूळ धरत असताना पोलंडमध्येही पुन्हा त्यांनाच बहुमत मिळते तर ते हिरमोड करणारे ठरले असते. या निकालाने तो हिरमोड टळला म्हणायचे. सातासमुद्रापारच्या न्यूझीलंडमध्ये कर्तबगार पंतप्रधान जेसिंडा आर्डर्न राजकीय पटलावरून दूर झाल्यानंतर त्यांच्या उदारमतवादी पक्षास ताज्या निवडणुकांत पराभवास सामोरे जावे लागले. त्या पार्श्वभूमीवर आधीच उजवीकडे झुकत असलेल्या पोलंडमध्ये काय होणार याची अनेकांस उत्सुकता होती. पोलंडने निराश केले नाही. अनेक अंगांनी या विजयाचे महत्त्व. ते जाणून घेण्याआधी न्यूझीलंडमध्ये उदारमतवाद्यांच्या पराभवाची दखल घेणे आवश्यक. आर्डर्नबाईंची राजवट अनेक मुद्द्यांसाठी महत्त्वाची होती. करोनाकाळात दाखवलेली कार्यक्षमता, धर्माभिमान्यांच्या नृशंस हल्ल्यानंतरचे औदार्य यामुळे आर्डर्न यांचे जागतिक स्तरावर कौतुक झाले. त्यांच्या मजूर पक्षाच्या सहा वर्षांच्या राजवटीत त्या देशात सहिष्णुतेचे मळे जोमाने फुलले. तथापि या सामाजिक कामगिरीस आणि सौहार्दास त्यांचा पक्ष आर्थिक जोड देऊ शकला नाही. आर्डर्नबाईंच्या करोनाकाळातील आर्थिक उपाययोजना चांगल्याच लोकप्रिय ठरल्या होत्या. तथापि हा काळ संपल्यावर आणि मुख्य म्हणजे 'आता नवीन करण्यासारखे काही नाही' असे सांगत पंतप्रधानपदावरून आर्डर्नबाई उतरल्यानंतर त्या देशास मोठ्या चलनवाढीस सामोरे जावे लागले. न्यूझीलंडच्या या सार्वत्रिक निवडणुकांत संपूर्ण प्रचारकाळात चर्चेचा विषय एकच होता. तो म्हणजे महागाई. आर्डर्नबाईंची जागा घेणारे ख्रिस हिपकिन्स यांना महागाई नियंत्रणात यश आले नाही. शिवाय आर्डर्नबाईंच्या चमकदार कामगिरीच्या पार्श्वभूमीवर हिपकिन्स यांची राजवट चांगलीच फिकी पडली. राजकारणात सर्वत्र हे असे होते. अत्यंत लोकप्रिय नेता क्षितिजावरून दूर गेला की त्याची जागा घेणारा तितका प्रभावशाली ठरत नाही. खेरीज न्यूझीलंडमध्ये आघाडी सरकारांची प्रथा आहे. म्हणजे आर्डर्नबाई लोकप्रिय होत्या तरीही त्यांचे सरकार स्वबळाचे नव्हते. डावे, पर्यावरणवादी अशा पक्षांना घेऊनच त्यांना सरकार बनवावे लागले. उजव्या राष्ट्रवादी पक्षाचे विन्स्टन पीटर्स हे आता उजवीकडच्या समविचारी पक्षांस हाताशी धरून सरकार बनवतील.त्याच वेळी पोलंडमध्ये मात्र उजव्यांच्या या आघाडीस मतदारांनी कौल दिला नाही. त्यामुळे आठ वर्षांनंतर पोलंडमध्ये आधुनिक आणि सहिष्णू विचारांचे सरकार येईल. या देशातील निवडणूक निकालाची दखल घ्यावयाची याचे कारण या देशाचे युरोप तसेच इतिहास यातील स्थान. भौगोलिकदृष्ट्या पोलंड मध्य युरोपात गणला जातो. चेक प्रजासत्ताक, बेलारूस–युक्रेन, रशिया, जर्मनी अशा अत्यंत महत्त्वाच्या देशांच्या गराड्यात असलेल्या पोलंडचे ऐतिहासिक आणि राजकीय मोलही मोठे. हिटलरच्या दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात पोलंडवरील हल्ल्याने झाली आणि याच पोलंडच्या व्याप्त भागात त्याची कुख्यात आउशवित्झ छावणी उभी राहिली. यहुदींच्या वेदनेस जगभरात वाचा फुटली ती आउशवित्झमुळे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात पोलंडने हिटलरची दडपशाही सहन केली. महायुद्धानंतर या देशाने सोव्हिएत रशियाच्या स्टालिनची अरेरावी अनुभवली. या देशा–तील साम्यवादी आपल्याशी एकनिष्ठ नसावेत अशा केवळ संशयाने स्टालिनने हजारो पोलिश नेत्यांचे शिरकाण केले. महायुद्धोत्तर शीतयुद्धकाळात हा देश रशियाच्या साम्यवादी गटात होता. त्याने तसे तेथेच राहावे यासाठी पोलिश जन–तेस साम्यवाद्यांच्या दांडगाईस सामोरे जावे लागले. तथापि जागतिक इतिहासात आश्चर्याची बाब म्हणजे याच साम्यवादी पोलंडमधील ख्रिश्चन धर्मगुरू कार्डिनल कारोल वोजत्याला हे ख्रिस्ती धर्मसत्तेच्या सर्वोच्च गुरुपदी– म्हणजे पोप– निवडले गेले. पोप जॉन पॉल (दुसरे) म्हणून ओळखले जातात ते हेच. याच पोलंडमधील वॉर्सा बंदरातून पुढे ८०च्या दशकात साम्यवादी राजवटीस आव्हान उभे राहिले आणि लेक वा–लेसा या साध्या गोदी कामगाराने कम्युनिस्टांच्या चिरेबंदी वाड्यास खिंडार पाडले. त्याच्या सॉलिडॅरिटी या पक्षाने काही काळ राज्यही केले. पुढे सोव्हिएत रशियात मिखाइल गोर्बाचोव यांचा उदय झाल्यानंतर साम्यवादी राजवटींचीच अखेर झाली आणि पोलंडचीही लाल दहशतीतून सुटका होऊन त्या देशात लोकशाही नांदू लागली. अगदी अलीकडे पोलंड गाजला तो ग्रेट ब्रिटनमधील 'ब्रेग्झिट' मोहिमेत. या मोहिमेस कारणीभूत अस–लेले स्थलांतरित मजूर हे मुख्यत: पोलिश होते. त्यांच्यामुळे आपले रोजगार जातात अशी भावना ब्रिटनमध्ये तयार झाली. त्यातून त्यामुळे एकंदर युरोपमधील खदखदच समोर आली.त्याच युरोपीय संघटनेत महत्त्वाची भूमिका बजावलेले डोनाल्ड टस्क यांच्याकडे आता पंतप्रधानपदाची सूत्रे जातील. टस्क हे पूर्वी युरोपीय देशांच्या परिषदेचे अध्यक्ष होते आणि पोलंडच्या पंतप्रधानपदाचाही अनुभव त्यांच्या ठायी आहे. या निवडणुकीत सहिष्णू, युरोपवादी तसेच युक्रेनवादीही पक्षांच्या आघाडीचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. युर–ोपवादी आणि काही प्रमाणात युक्रेनवादी भूमिकेमुळे त्यांच्या विजयाचे महत्त्व केवळ पोलंडपुरतेच मर्यादित राहात नाही. ते संपूर्ण युरोपसाठी लक्षणीय ठरते. टस्क यांच्या आघाडीने ज्यांचा पराभव केला त्या उजव्या, लोकानुनयी पक्षाच्या सरकारने सुरुवातीस युक्रेनच्या बाजूने भूमिका घेतली होती. पण नंतर ती बदलली. त्यामुळे शेजारील बेलारूसप्रमाणे पोलंडही युक्रेनविरोधी गणला जाऊ लागला. त्यात विद्यमान सरकारचे असहिष्णू धोरण. त्यामुळे पोलंड हळूहळू एकाधिकारशाहीकडे वाटचाल करू लागल्याचे चित्र निर्माण झाले. अलीकडे जगातील अनेक देशांत 'मतपेटीद्वारे हुकूमशाही' (इलेक्टेड डिक्टेटरशिप) असा नवाच प्रकार उदयास आल्याचे पाहायला मिळते. निवडणुकांतील यशाद्वारे सत्ता मिळवायची आणि ती मिळाली की आपली हुकूमशाही वृत्ती परजत लोकशाहीस आवश्यक सर्व संस्थांचे खच्चीकरण करायचे हा नवा प्रकार अनेक देशांत दिसतो. युरोपातील टर्की, हंगेरी आदी देशांप्रमाणे पोलंडमध्येही तेच सुरू होते.टस्क यांच्या निवडीने त्यास आळा बसेल. ''आता देशात पूर्ण लोकशाही नांदेल,'' असे उद्गार टस्क यांनी निवडणूक निकालानंतर काढले. पण त्यांच्या आघाडीस हे लोकशाहीस नांदवणे वाटते तितके सोपे नाही. कारण



अध्यक्षपदावरील व्यक्ती ही सरळ सरळ राजकीयच आणि न्यायिक प्राधिकरणातील बहुतांश न्यायाधीश हेही आधीच्या राजवटीस निष्ठा वाहिलेले. परिणामी अध्यक्ष महत्त्वाच्या अनेक विधायकांवर आ–पला नकाराधिकार वापरतील आणि प्रकरणे न्यायालयात गेल्यास न्यायाधीश अनुकूल निर्णय न देण्याचीच शक्यता अधिक. तेव्हा हाती आलेल्या लोकशाहीच्या पाळण्याची दोरी हातातच राखणे टस्क यांच्यासाठी सोपे नाही, हे उघड आहे. पण असहिष्णुतेच्या अंधारात चाचपडत राहण्यापेक्षा लोकशाहीच्या पहाटेची अंधूकशी का असेना; पण चाहूल केव्हाही आशादायी आणि आश्वासक असते. पोलंडमधील निकाल ही अशी पहाट आहे.

# मीरा मॅडमची मिस्टेक!

मीरा बोरवणकर यांची कारकीर्द फारच कौतुकास्पद आणि त्यांचे निवृत्तीनंतरचे आयुष्य तर फारफारच कौतुकास्पद. सेवाकाळात त्यांच्यावर एकदाही कसलाही आरोप झाला नाही. कोणीही कोणताही अश्लाघ्य आरोप केलाच तर भाजपच्या राजकीय अभयारण्यात लाखो स्वयंसेवक छातीचा कोट करून आपला बचाव करण्यास सज्ज आहेत याचा दादांना विसर पडला..मीरा बोरवणकर यांची कारकीर्द फारच कौतुकास्पद आणि त्यांचे निवृत्तीनंतरचे आयुष्य तर फारफारच कौतुकास्पद. सेवाकाळात त्यांच्यावर एकदाही कसलाही आरोप झाला नाही. अर्थात असा एकही आरोप ज्यांच्यावर होत नाही त्यांच्या उपयुक्ततेबाबत अलीकडच्या काळात प्रश्न निर्माण होतात हे खरे. पण मीरा बोरवणकर या त्या अर्थाने 'जुन्या' काळच्या प्रतिनिधी. त्या काळात काही तत्त्वे पाळली जात. कसलेही बालंट न येणे यात अभिमान मानण्याचा तो काळ. त्या सेवाकाळात बोरवणकरबाईंवर काही कसलेही आरोप झाले नाहीत आणि निवृत्तीनंतर एखाद्या पक्षाची खासदारकी, कोणत्या समित्यांवर नेमणूक किंवा गेला बाजार राज्य लोकसेवा आयोगात एखादे पद वगैरेही त्यांच्या वाट्याला आले नाही. तसे ते पदरात पडावे यासाठी सेवाकाळातच प्रयत्न करायचे असतात हे त्यांना माहीत नसणार. खरे तर स्वत:चे पूर्वसुरी सत्यपाल सिंग यांच्याकडून त्यांना काही शिकता आले असते. सेवाकाळात निवडक नैतिकतेचे प्रदर्शन केले की प्रतिमाही तयार होते आणि निवृत्तीनंतरही बरेच काही मिळते हे त्यांना त्यामुळे उमगले नसावे. असतात असे काही. बोरवणकरबाई पोलीस सुधारणांसाठी बऱ्याच प्रयत्नशील होत्या. त्याबाबत त्यांनी सविस्तर अभ्यास करून अत्यंत विस्तृत असा अहवाल दिला होता. पण बोरवणकरबाईंचा झाला म्हणून काय झाले? अह–वाल तो अहवाल. त्यामुळे अन्य अशा अभ्यासपूर्ण अहवालांचे जे काही होते तेच बोरवणकरबाईंच्या अहवालाचे झाले. तरीही त्यांची लिहायची सवय काही गेली नाही. निवृत्तीनंतर अहवाल नाही; तर त्यांनी पुस्तकच लिहिले. ते सध्या चांगलेच गाजते आहे. अलीकडे पुस्तक न वाचताही गाजवता येत असल्याने अनेकांनी त्यावर प्रतिक्रिया दिल्या. पण त्या प्रतिक्रियांवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली तेव्हा ते पुस्तक यथायोग्य ठिकाणी पोहोचले असे म्हणता येईल. पुस्तकावरील प्रतिक्रियांवर प्रति–प्रतिक्रिया देण्याआधी अजितदादांनी ते पुस्तक वाचले होते किंवा काय याची कल्पना नाही. कदाचित असेही असेल की पुस्तकाचा मथितार्थ संक्षिप्त स्वरूपात सुप्रियाताईंनी आपल्या दादासाठी पाठवला असेल. तसे त्या आपल्या दादासाठी नेहमीच खूप काही करतात. हल्ली तर जास्तच. दिवाळी जवळ आल्यामुळे बहुधा भाऊबिजेत काही विशेष ओवाळणी मिळण्याची त्यांना आशा असावी. असो. पण या बोरवणकरबाईंच्या



पुस्तकात दादांच्या नसलेल्या उल्लेखाबद्दल जो धुरळा उडाला त्यात दादांच्या पांढऱ्या कुडत्यावर जी धूळ बसली ती झटकण्यासाठी काही त्या पुढे आल्या नाहीत. त्यामुळे हे काम खुद्द दादांनाच करावे लागले. दादा ते करायला गेले आणि तिथेच फसले. अशी हलकी–सलकी कामे करायची सवय नसल्यामुळे असेल, पण बोरवणकरबाईंच्या पुस्तकात नसलेल्या उल्लेखावर काही उल्लेखनीय खुलासा करण्याची गरज नसताना दादांनी तो केला. वास्तविक पवार म्हटले की राजकारणात कधी काय करायचे याचे अंगभूत ज्ञान असणे अपेक्षित असते. दादांच्या अंगीही ते आहे असा महाराष्ट्राचाही समज होता. बोरवणकरबाईंच्या पुस्तकावर खुलासा देण्याच्या त्यांच्या या प्रयत्नाने या समजाचा भंग झाला.याचे साधे कारण असे की आपण आता कोणाच्या सान्निध्यात आहोत याचाच दादांना विसर पडला, असे स्पष्ट अनुमान त्यांच्या या खुलाशामुळे काढता येते. दादा हे आता भाजपच्या दिल्ली दरबारातले चांगले दहा–हजारी मनसबदार आहेत. एकदा का त्या दरबारात स्थान मिळाले की कवचकुंडले प्राप्त होतात आणि कोणताही भ्रष्टाचारादी आरोप अंगाला स्पर्शच करू शकत नाही. महाराष्ट्र ते आसाम ते प. बंगाल अशी सर्वत्र सर्वदूर या सत्याची प्रचीती येईल. इतके लांबचे पाहायचे नसेल तर आपल्या आसपास नजर फिरवली तरी दादांस हे सत्य अवगत होईल. अर्थात या सत्याचा अनुभव आपल्यालाही यावा म्हणूनच तर ते काकांचा हात सोडून भाजपत गेले. त्यांच्या बाजिंद्या–साजिंद्यांना भले काहीही वाटो की आपल्या नेत्यांस मुख्यमंत्रीपदाचे आश्वासन भाजपने दिलेले आहे. पण तसे काही नाही. पाठीस लागलेल्या केंद्रीय यंत्रणांच्या तलवारी यांच्या दरबारात गेलो तर म्यान होतील याची हमखास खात्री असल्याने दादांच्या राजकीय प्रवासाची दिशा वळली. तेव्हा सध्या राजकीय अभयारण्यात वास्तव्य असतानाही कोण त्या बोरवणकरबाई, ज्यांनी न केलेल्या आरोपाचा खुलासा त्यांना करावासा वाटावा? या अभयारण्याच्या अदृश्य भिंती भेदू शकेल अशी एकही राजकीय ताकद या भारतभूमीवर आज अस्तित्वात नाही. या भिंती भेदून आत असलेल्यांस स्पर्श करू शकेल इतकी भेदकता कोणाच्याही आरोपात नाही. असे असतानाही आपल्यावर न केलेल्या आरोपांचा खुलासा करण्याची ऊर्मी दादांच्या कठोर हृदयात का निर्माण झाली, हा प्रश्न. आणि दुसरे असे की ते सध्या भाजपच्या राजकीय अभयारण्यात विहार करत असल्याने असा कोणताही अश्लाघ्य आरोप त्यांच्यावर कोणी केलाच तर आपल्या छातीचा कोट करून त्यांचा बचाव करण्यास लाखो स्वयंसेवक सज्ज आहेत याचाही त्यांना विसर पडला. आपल्या शीलाचे संरक्षण ही आता ऊठ म्हटल्यावर उठणारे आणि बस न म्हणताही बसणारे अनेक स्वयंसेवक, समाजमाध्यमातील अदृश्य पण परिणामकारक जल्पकसेना आणि राज्यभरातले भाजप सतरंजी–प्रवीण कार्यकर्ते यांची जबाबदारी आहे हे दादा नक्कीच विसरले असणार.

# आयुर्वेदाच्या स्मृतीतून : दातांचे आरोग्य




आजकाल फेस आला नाही तर दात घासलेत असे लोकांना वाटतच नाही. मग याचे प्रमाण अधिक झाले की दातांची झीज सुरू होते. दात स्वच्छ दिसतात मात्र लवकर झिजतात. वैद्य हरीश पाटणकर पूर्वीच्या काळी भारतीय लोक चुलीतून तयार होणाऱ्या राखेने दात घासत असत. नंतर काही कंपन्यांचा भारतीय बाजारपेठेत प्रवेश झाला आणि राखेने, कोळशाने दात घासणे दातांच्या आरोग्याला किती घातक आहे असे ते पटवून देऊ लागले. त्यांनी कॅल्शियम असणाऱ्या पावडर व पेस्ट विकायला आणल्या. सर्वांनी त्याचा वापर सुरू केला. हळूहळू लोकांचे दातांचे आरोग्य सुधारण्याऐवजी खराबच होत गेले. मग सतत काही तरी नवीन देण्याच्या प्रयत्नात त्यांनी 'टूथपेस्ट में नमक है? निंबू है?' अशी विचारणा करत हळूहळू पेस्टमध्ये मीठ, लिंबू, निंबपत्र अशा वेगवेगळ्या आयुर्वेदिकव पारंपरिक गोष्टींचाच समावेश करून आपले मार्केट कायम राखण्याचा प्रयत्न केला. मात्र तरीही लोकांचे दातांचे आरोग्य काही सुधारत नाही असे लक्षात आले. एकाच घरामध्ये पारंपरिक पद्धतीने दात घासणाऱ्या आजोबांचे दात चांगले आहेत, तर गेली सलग २० वर्षे पेस्ट वापरणाऱ्या आधुनिक विचारांच्या मुलांचे दात खराब होऊ लागले आहेत. नातवांच्या दातांच्या आरोग्याबद्दल तर न बोलणेच चांगले, अशी परिस्थिती सध्या आली आहे. प्रत्येकाने रोज दोन दोन वेळा पेस्टने ब्रश करूनही लोकांमध्ये दातांचे आरोग्य खालावलेले आहे. असे का होत आहे याचा अभ्यास करून मग कंपनीने पुन्हा आपल्या पेस्टमध्ये थोडा बदल करत त्यात 'चारकोल' वापरून नवीन पेस्ट बाजारात आणली. हा चारकोल तुमच्या दातांमध्ये खोलवर लपून बसलेले किटाणू घालविण्यास सक्षम असून याने दातांचे आरोग्य वाढते असा दावा सुरू केला. मोफत मिळणारा कोळसा किंवा मीठ हजार रुपये किलो दराने आम्हालाच विकायला सुरुवात केली. जरा विचारपूर्वक या संपूर्ण घटनेकडे पाहा. हा चारकोल म्हणजेच कोळसा म्हणजेच राख. पण आतासुद्धा कोळशाने किंवा राखेने दात घासा म्हटलं तर कोणी घासणार नाही, मात्र चारकोलयुक्त पेस्टने घासा म्हटले की लगेच विश्वास ठेवून घासतील. पूर्वीच्या काळी दातांचे, हिरड्यांचे आरोग्य सुधारावे म्हणून दंतधावन केले जात होते. आजकाल फक्त मुलींनी आकर्षित व्हावे, मुखदुर्गंधी जावी व दात पांढरेशुभ्र स्वच्छ दिसावेत फक्त एवढ्यासाठीच दात घासले जातात. मग फेस येण्यासाठी व दात स्वच्छ होण्यासाठी त्यात सोडियम लॉरेल सल्फेट नावाचे रसायन मिसळले जाते.आजकाल फेस आला नाही तर दात घासलेत असे लोकांना वाटतच नाही. मग याचे प्रमाण अधिक झाले की दातांची झीज सुरू होते. दात स्वच्छ दिसतात मात्र लवकर झिजतात. जसे कपडे जास्त स्वच्छ दिसण्यासाठी जास्त घासले, जास्त साबण लावून जास्त फेस केला की ते स्वच्छ होतात, दिसतात मात्र लवकर झिजतात तसेच. मग दाताच्या वरचा थर झिजून तुमचे दात संवेदनशील बनतात. मग या सेन्सिटिव्ह दातांसाठी नवीन पेस्ट. जास्त झिजले तर सिमेंट भरणे, रूट कॅनॉल करणे आलेच. मग या दुष्टचक्रातून बाहेर पडायचे असेल, आपल्या नव्या पिढीचे दात वाचवायचे असतील तर प्रत्येक आहारानंतर मुलांना प्रथम खळखळून, आवाज करून चूळ भरण्याची सवय लावा. जास्त वेळ पेस्टचा अतिरेक टाळा व किमान पेस्ट करून झाल्यानंतर मुलांना लिंबाच्या काडीने दात घासणे, हळद व मीठ सम प्रमाणात घेऊन त्याने दात घासणे किंवा अर्क, खदिर, करंज अशा वनस्पतींनी युक्त आयुर्वेदिक दंतमंजनाने दात घासायची सवय लावली पाहिजे. ज्यांचे दात फार पिवळे होत आहेत त्यांनी मधाने दात घासले तरी स्वच्छ पांढरे होतात हा अनुभव आहे. हे सर्व घटक दातांमधील किटाणू मारून टाकतात व हिरड्यांना बळ देतात. कोणतीही राख, कोळसा हा सर्वोत्तम स्वच्छताकारक असतो. म्हणून पाणी स्वच्छ करण्यासाठीसुद्धा अनेक जलशुद्धीकरण केंद्रात याचाच वापर करतात. लक्षात ठेवा सर्वच जुन्या गोष्टी टाकाऊ नसतात आणि सर्वच नवीन जाहिराती आरोग्यदायक नसतात. आपल्या काही जुन्या परंपरांच्या पाठीमागील शास्त्र शिकून घेतल्यास आपल्या दातांना नक्कीच चांगले आरोग्य प्राप्त होईल.

# काळजाचा ठोका पुन्हा पुन्हा चुकतो तेव्हा

ग्रुप थेरपी जिथे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली लोक आपले अनुभव, भावना आणि समस्या व्यक्त करतात तेही चांगले आहे. इस्त्रायल आणि हमास यांच्यात चालू असलेल्या भीषण युद्धाच्या बातम्या हादरून टाकणाऱ्या आहेत. तिथली सीसीटीवी कॅमेऱ्याची दृश्यं हृदय हेलावणारी आहेत. सामान्य नागरिकांना अकस्मात गोळ्या झाडणारी दृश्यं, भल्यामोठ्या इमारती क्षेपणास्त्राच्या एका तडाख्यात जमीनदोस्त होतानाची दृश्यं, लहान निरागस मुलांना जीवे मारून जाळल्याचे व्हिडीओ, जनसामान्यांचा हृदयाला चिरून काढेल असा आक्रोश, हे सगळे मानवतेला काळिमा फासणारे तर आहेच पण या शिवाय या सगळ्याचे दूरगामी मनावर होणारे परिणाम ही तितकेच भयंकर भासणारे आणि त्रासदायक आहेत.असा कुठल्याही प्रकारचा ट्रॉमा किंवा आघात होऊन किंवा कुठून तरी अशा आघाताचं ज्ञान झाल्यास जी मानसिक लक्षण निर्माण होतात त्याला पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (झढडऊ) असे म्हणतात . मग ही आपत्ती नैसर्गिक (भूकंप, स्तुनामी , प्रेमाच्या माणसाला गमावणे) असो की मानवी (धर्मवादातून निर्माण होणारी दंगल, गर्दी किंवा अचानक धोक्याची सूचना आल्यावर होणारी चेंगराचेंगरी, बलात्कार), पण मन तर मन आहे. त्यावर होणारे आघात खोलवर अंतर्मनात जाऊन बसतात. कोविड संकटानंतर आयसीयूतून बाहेर आपल्या वडिलांचे शव आणताना इतर अनेक शव बघितले आणि आता अगदी रात्रीसुद्धा मला तशीच स्वप्नं येतात आणि दचकून जाग येऊन मी सैरभैर घरात पळतो असे लक्षण झढडऊचे आहे. ही लक्षणं अशा विध्वंसक घटनेनंतर लगेचच किंवा एक ते दोन आठवड्यात सुरू होतात आणि एक ते सहा महिने किंवा त्यापेक्षा ही जास्त काळ राहू शकतात. अशा घटनेनंतर १०० पैकी ७-८ लोक झढडऊ अनुभवतात. या आजारात भावनांबरोबर त्या प्रसंगाची काही चित्रं डोक्यात कैद होतात ते एक ळारसशीू बनतात आणि त्याची अनैच्छिक आठवण तयार होते , त्याबरोबरच खराब स्वप्नं पडतात . त्याला षश्ररीहलरलज्ञ म्हणतात. थंडी वाजून येणे, भीती वाटणे , डोकेदुखी अशी लक्षणे प्रामुख्याने दिसतात.काहींना त्या घटनांबद्दल ऐकलं तरी त्रास होतो आणि त्यासाठी ते अशा गोष्टी किंवा जागा टाळतात ज्यामुळे त्यांना त्या प्रसंगाची आठवण होईल. अतिसतर्कता आणि उत्तेजना म्हणजे खूप पटकन दचकणे , शांत झोप न येणे , चिडचिड्पणा , तीव्र राग येणे , एकाग्रतेत कमी होणे ही लक्षणे यात दिसतात. भावनिकदृष्टया खचल्याने सुख किंवा दुःखाच्या क्षणी त्या भावना इतरांसारख्या त्यांना अनुभवणे कठीण जाते. आधी ज्या गोष्टीत रस वाटायचा ते तसे वाटणे ही कमी होऊ शकते. काही लोक यातून घटनेनंतर आठवड्यात हळूहळू सावरायला लागतात पण काहींना महिने किंवा वर्ष लागतात. त्यातच पॅनिक अटॅक , उदासीनता , आत्महत्येचे विचार येणे , मादक पदार्थांचे सेवन अशीही लक्षणे येऊन रोजच्या दैनंदिन जीवनात अडथळे निर्माण होतात . झढडऊ चे वेळेत निदान आणि उपचार होणे अतिशय आवश्यक आहे.

# उपवासाला साबुदाणा खावा का? वाचा आहारतज्ज्ञ काय सांगतायत.

बहुतांश लोकांना उपवासाला साबुदाणा खिचडी खायला आवडते. जर तुम्हालाही आवडत असेल, तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. उपवासाला साबुदाणा खावा का? साबुदाण्यामध्ये कोणते पौष्टिक घटक असतात? याविषयी आहारतज्ज्ञ पल्लवी सावंत यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सविस्तर माहिती दिली. उपवास म्हटलं की, आपण साबुदाणा, वरईसारखे निवडक पदार्थ किंवा फळे खातो. बहुतांश लोकांना उपवासाला साबुदाणा खिचडी खायला आवडते. जर तुम्हालाही आवडत असेल, तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. उपवासाला साबुदाणा खावा का? साबुदाण्यामध्ये कोणते पौष्टिक घटक असतात? याविषयी आहारतज्ज्ञ पल्लवी सावंत यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सविस्तर माहिती दिली. साबुदाणा कशापासून बनतो? साबुदाणा कंदमुळापासून बनतो. त्यामुळे पारंपरिक उपवासाच्या पदार्थांमध्ये साबुदाण्याचा समावेश करण्यात आला आहे. खरे तर नवरात्रीच्या उपवासामध्ये जेवढे तुम्ही कमी खाल, तेवढे चांगले आहे. आहारतज्ज्ञ पल्लवी सावंत नवरात्रीच्या उपवासाविषयी बोलताना सांगतात, ज्या वेळी तुम्ही नवरात्रीचे उपवास करता त्यावेळी खूप चविष्ट साबुदाण्याची खिचडी खावी, हा मुद्दा येता कामा नये. कारण- तुमच्या जिभेवरचा संयम हे नवरात्रीच्या उपवासाचं खूप मोठं फलित असणार आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जर तुम्ही फक्त साबुदाण्याची खिचडी खात असाल, तर त्याचं प्रमाणदेखील लक्षात घेणं आवश्यक आहे. उपवासाला त्वरित ऊर्जा देणारा पदार्थ म्हणून आपण साबुदाण्याचा एक पर्याय म्हणून वापर करू शकतो.फायदे साबुदाणा खाल्ल्यामुळे लगेच ऊर्जा मिळते. साबुदाण्यामध्ये कार्ब्सचे प्रमाण चांगले असते आणि त्यात रेजिस्टन्स स्टार्च असतो. हा एक स्टार्चचा प्रकार आहे; जो पचायला हलका आहे. त्यामुळे उपवासाच्या पदार्थांमध्ये साबुदाण्याला अधिक महत्त्व आहे. साबुदाणा खिचडीच्या रेसिपीमध्ये आपण शेंगदाण्याचे कूट, तूप इत्यादी गोष्टींचा समावेश करतो. त्यामुळे साबुदाण्याची खिचडी ही उत्तम कार्ब्स आणि फॅट्सयुक्त होते, जी तुम्हाला एकदा खाल्ली की, पुरेशी वाटते.तोटे साबुदाण्यामध्ये प्रोटिन्सचे प्रमाण खूप कमी आहे. त्यामुळे साबुदाण्याबरोबर दूध किंवा दही खावे. साबुदाण्याला पर्यायी पौष्टिक पदार्थ वरई किंवा भगर, राजगिरा, शिंगाड्याच्या पिठाचे थालीपीठ खाऊ शकता. साबुदाण्याचे थालीपीठ करताना, त्यात शिंगाड्याचे पीठ मिसळावे. त्यामुळे तुम्हाला त्यातून प्रोटिन मिळू शकते.उपवास करताना खूप जास्त प्रमाणात न खाणे हेही तितकेच आवश्यक आहे. दिवसभर आपण खात असतो, चमचमीत पदार्थांचा आस्वाद घेतो. जसजसे तापमान बदलते तसतसा तुमच्या रोगप्रतिकारशक्तीवर परिणाम होतो. तुमची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी तुमच्या पचनसंस्थेला चांगला आराम देणे आणि त्यानंतर खाणे हा उपवास करतानाचा खूप महत्त्वाचा मुद्दा आहे.नवरात्रीदरम्यान आपण थेट ऑक्टोबरमधून डिसेंबरमध्ये जातो. यादरम्यान साथीचे आजार खूप पसरतात. जर तुम्हाला रोगप्रतिकारशक्ती वाढवायची असेल, तर उपवासाच्या दिवशी नुसते खात राहण्याऐवजी तुम्ही साधे जेवण करावे. जिभेचे चोचले कमी करून आवश्यक तेवढाच कमीत कमी आहार घेऊन स्वत:शी जुळवून घेणे गरजेचे आहे. जर तुम्ही गर्भवती असाल, तुम्हाला मधुमेह असेल अथवा जर तुम्ही स्तनपान करणारी आई असाल, तर तुम्ही उपवास करू नये.साबुदाण्यामध्ये कोणते घटक आढळतात?साबुदाणा ऊर्जेचा




उत्तम स्रोत आहे. आतड्यांच्या आरोग्यासाठी यात चांगले कार्ब्स असतात. ज्यांना पचनाशी संबंधित आजार आहे, त्यांच्यासाठी हे चांगले आहे. सगळ्या वयोगटासाठी साबुदाणा उपयुक्त आहे. साबुदाण्यामध्ये कोलेस्ट्रॉल नसल्यामुळे खाण्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे.साबुदाणा कसा खावा?जर तुम्ही साबुदाणा एखाद्या पदार्थामध्ये मिसळून खात असाल, तर चांगले आहे; पण साबुदाण्यामध्ये स्टार्च असल्यामुळे लगेच ऊर्जा मिळते. त्यामुळे दिवसभरातील शरीरातील प्रोटिन्सचे स्वरूप बदलत असते.
शरीराला व्यवस्थित प्रोटिन्स मिळावेत यासाठी साबुदाण्याबरोबर एक वाटी दही किंवा दूध घेणे आवश्यक आहे.असे म्हणतात की, साबुदाणा पचायला जड असतो. जेव्हा साबुदाण्यामध्ये साखर किंवा मीठ किंवा जास्तीची प्रक्रिया केली जाते, तेव्हा तो पचायला जड जातो. फ्राइड साबुदाणा खाण्यापेक्षा वाफेवर तळून खाल्लेला साबुदाणा अधिक चांगला असतो. वजन वाढवण्यासाठीसुद्धा साबुदाणा उत्तम पर्याय आहे. अनेक लोक खिचडी, साबुदाणा वडा, थालीपीठ करून खातात. साबुदाणा वड्यापेक्षा खिचडी आणि थालीपीठ खाणे अधिक चांगले आहे. उपवासाला साबुदाणा खावा की नाही, ही तुमची वैयक्तिक निवड असू शकते; पण कोणताही पदार्थ खाताना संतुलित आहार घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. उपवासादरम्यान योग्य पद्धतीने साबुदाणा खाणेही महत्त्वाचे आहे.

# कोरड्या त्वचेमुळे त्रस्त आहात?ओट्स आहेत मदतीला! जाणून घ्या 'हे' होममेड स्क्रब्स



थंडीचे दिवस सुरू झाले की आपल्याला त्वचेची खास काळजी घ्यावी लागते. त्यातल्या त्यात कोरड्या त्वचेची या दिवसांमध्ये खास काळजी घेणे गरजेचे असते. कोरडी त्वचा असणाऱ्यांसाठी हिवाळा फारच त्रासदायक ठरतो.या दिवसांमध्ये त्वचेला जास्त मॉईश्चराईझ केल्यामुळे चेहऱ्यावर मृत त्वचा जास्त प्रमाणात जमा होऊ लागते. त्यामुळे, त्वचेचे स्क्रब करण्याची गरज पडू शकते. कोरड्या त्वचेवर कोणतेही स्क्रब केल्याने त्वचा आणखी कोरडी होण्याचा धोका असतो. कोणतेही स्क्रब करण्यापूर्वी ते आधी तुमच्या त्वचेला सूट होते का ? हे पाहणे महत्वाचे ठरते.
चेहऱ्याला स्क्रब सूट झाले नाही तर कोरडी त्वचा आणखी कोरडी पडू शकते. त्यामुळे, तुमची त्वचा लक्षात घेऊन त्याप्रमाणे स्क्रबची निवड करणे आवश्यक आहे. कोरड्या त्वचेसाठी बाजारात अनेक प्रकारचे केमिकलयुक्त स्क्रब्स उपलब्ध आहेत.मग तांदूळ आहे मदतीला! जाणून घ्या 'हे' होममेड स्क्रब्स परंतु, जर घरगुती स्क्रब्सचा त्वचेवर वापर केल्यास कोरड्या त्वचेला त्याचे अनेक फायदे मिळू शकतात. होममेड स्क्रब्समुळे कोरड्या त्वचेवर साचलेली मृत त्वचा, टॅनिंग निघून जाण्यास मदत मिळते आणि त्वचेला योग्य पोषण मिळते. आज आपण होममेड स्क्रब्सबद्दल जाणून घेणार आहोत, जे कोरड्या त्वचेसाठी फायदेशीर आहेत.
साखर आणि मध २ चमचे साखर आणि १ चमचा मध एकत्र करून ते चांगले मिसळा. जेणेकरून चांगल्या प्रकारे साखर विरघळू शकेल. त्यानंतर, या स्क्रबने चेहऱ्यावर हलक्या हातांनी मसाज करा. २० मिनिटांनी चेहरा धुवून टाका.मधामुळे त्वचेला पोषण मिळण्यास मदत होते आणि त्वचा मऊ राहते. साखरेमुळे चेहऱ्यावरील टॅनिंग आणि मृत त्वचा निघून जाण्यास मदत होते. अधिक चांगल्या परिणामांसाठी आठवड्यातून २ वेळा या स्क्रबचा वापर करा.
बदाम आहे मदतीला! जाणून घ्या 'हे' होममेड फेसपॅक्स
ओट्स आणि कोरफड कोरफड ही सर्व प्रकारच्या त्वचेसाठी फायदेशीर आहे. कोरड्या त्वचेसाठी कोरफड आणि ओट्सचे स्क्रब लाभदायी आहे. ओट्समध्ये असलेल्या पोषकघटकांमुळे ते चेहऱ्याला खोलवर साफ करण्यास मदत करते.हे स्क्रब करण्यासाठी कोरफडचा गर घ्या आणि त्यामध्ये ३ चमचे ओट्स पावडर घ्या. आता, हे दोन्ही घटक चांगले मिक्स करा. आता या मिश्रणाने चेहऱ्यावर हलक्या हाताने १० मिनिटे स्क्रब करा. त्यानंतर, २० मिनिटांनी चेहरा पाण्याने धुवून टाका.कॉफी स्क्रब कॉफीचे स्क्रब हे कोरड्या त्वचेसाठी अतिशय फायदेशीर आहे. हे स्क्रब तयार करण्यासाठी एका भांड्यात ३ चमचे कॉफी घ्या, आता त्यामध्ये पाणी मिसळा. आता या मिश्रणाने चेहऱ्याचे १५ मिनिटे स्क्रब करा. २० मिनिटांनंतर चेहरा धुवून टाका. कॉफीमध्ये असणारे लहान कण हे तुमची त्वचा स्क्रब करण्यास मदत करतील.

# 'माझ्या बॅगमध्ये ८ शर्ट, शाईफेक झाली की लगेच बदलतो';

मुंबई- सोलापुरचे नवे पालकमंत्री चंद्रकात पाटील यांच्यावर काही दिवसांपूर्वी सोलापूरमध्ये शाई फेक करण्यात आल्याची घटना घडली होती. कंत्राटी भरतीच्या विरोधात त्यांच्यावर शाईफेक करण्यात आली होती. याआधी पिंपरीमध्ये त्यांच्यावर शाईफेक करण्यात आली होती. या मुद्द्यावरुन चंद्रकात पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माझ्याकडे आठ शर्ट कायम असतात. त्यामुळे मी शाईफेक झाल्यास तयारच आहे, असं ते म्हणाले आहेत.मी कशासाठीही तयार आज मी खूपच सर्वसामान्य नागरिकांना भेटलो.अजूनही कोणी असेल तर मी भेटायला तयार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी खबरदारी घेतली आहे. काही होऊ नये म्हणून ते काळजी घेत आहेत. जे व्हायचं आहे ते चुकत नाही. आणि मी कशासाठीही तयार असतो. माझ्या बॅगमध्ये आठ शर्ट असतात. शाईफेक केली की मी लगेच दुसरा शर्ट घालतो, असं चंद्रकांत पाटील म्हणाले आहेत.दोनवेळा शाईफेक दोन वेळा माझ्यावर शाईफेक करण्यात आली होती. दोन्ही वेळा मी तिसऱ्या मिनिटाला नवीन शर्ट घालून बाहेर पडलो. सोलापूरमध्ये शाईफेकीची घटना घडल्यानंतर मी पाचशे निवेदनं स्विकारले आहेत. गर्दीचा फायदा घेऊनच त्याने माझ्यावर शाई फेकली होती, असं चंद्रकात पाटील म्हणाले.चंद्रकात पाटील यांना सोलापूरचे पालकमंत्री करण्यात आलं होतं. यावेळी ते पहिल्यांदाच सोलापूर दौऱ्यावर गेले होते. त्यावेळी त्यांच्यावर शाईफेक करण्यात आली. या घटनेनंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून त्यांची विशेष काळजी घेतली जात आहे.

# केवळ ट्रान्सजेंड आहे म्हणून पोलिसांनीच नापास केलं; न्यायालयीन लढाई जिंकली अन् गंगा कुमारी कॉन्स्टेबल झाली!

संघर्ष तर प्रत्येकाच्या जीवनात असतो. पण फार कमी लोक त्याचा सामना करू शकतात. काही लोक ध्येय मध्येच सोडून जातात. तर काही लोक शेवटपर्यंत टिकून राहतात. अशाच संघर्षांवर मात करून राजस्थानमधील एक तृतियपंथी पोलिस कॉन्स्टेबल बनल्या आहेत. राजस्थानमधील जालोरमध्ये राहणाऱ्या गंगा कुमारी यांची ही कथा. राजस्थानच्या जालोर जिल्ह्यातील रानीवाडा शहरातील तृतियपंथी गंगा कुमारी यांचे आयुष्य जन्मापासूनच अडचणींनी भरलेले होते. ट्रान्सजेंडर गंगा कुमारीने स्वाभिमानाने जगण्याचा निर्णय घेतला आणि २०१२ मध्ये राजस्थान पोलीस भरती परीक्षा दिली. परीक्षेला बसलेल्या दिड लाख उमेदवारांपैकी ती एक होती. २०१३ मध्ये लेखी परीक्षा दिली होती, तिचा निकाल २०१४ मध्ये आला होता. ज्यामध्ये गंगा कुमारीसह ११ हजार ४०० जण यशस्वी झाले.पण, मेडिकलच्या चाचणीवेळी गंगा कुमारीला नियुक्ती नाकारण्यात आली. जो तिच्यासाठी मोठा धक्का होता. तृतियपंथी असल्यामुळे पोलीस विभागाने तिला नोकरी देण्यास नकार दिला होता. पोलिसांच्या निर्णयाविरोधात गंगा कुमारीने हायकोर्टात याचिका दाखल केली.दोन वर्षे चाललेल्या प्रदीर्घ कायदेशीर लढाईनंतर नोव्हेंबर २०१७ मध्ये गंगा राजस्थान उच्च न्यायालयाच्या जोधपूर खंडपीठातून जिंकल्या. उच्च




न्यायालयाच्या निर्णयानंतर गंगा यांना १४ नोव्हेंबर २०१७ रोजी पोलिसात नोकरी मिळाली.देशात पहिली येण्याचा चान्स हुकला पोलीस भरती परीक्षेचा निकाल आला खरा पण मध्येच माशी शिंकली. जर पोलिसांनी गंगा यांना थांबवलं नसतं तर देशातील पहिल्या तृतियपंथी पोलिस होण्याचा मान गंगा यांना मिळाला असता. पण, ज्या वेळी गंगा कायदेशीर लढाई लढत होती, त्या वेळी चेन्नईची ट्रान्सजेंडर प्रितिका याशिनी ही पहिली पोलिस उपनिरीक्षक बनली होती.यशिनी यांनाही न्यायालयाच्या आदेशानंतरच नियुक्ती मिळाली. यानंतर तामिळनाडूच्या मदुराई येथील रहिवासी असलेल्या आर नसरिया यांची पोलीस हवालदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. पोलीस खात्यात नियुक्ती मिळवणारी गंगा या राजस्थानमधील पहिल्या आणि देशातील तिसऱ्या ट्रान्सजेंडर आहे.

## गोंडवाना कृती समीती च्या वतीने जिल्हा पोलीस अधिक्षकांना निवेदन
## आदिवासी राजा महात्मा रावण यांचे दहन करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करा

लाखनी – हिंदू रितीरीवाजानुसार दसरा सणाला हिंसा व वाईटाचे प्रतीक समजून रावणाचे दहन केले जाते. ही परंपरा फार पूर्वीपासून सुरू आहे परंतु या प्रकारामुळे आदिवासी समाजाच्या भावना दुखावत असल्याची तक्रार गोंडवाना कृती समिती भंडारा जिल्हा यांनी पोलिस अधिक्षकांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

आदिवासी राजा महात्मा रावण हे आदिवासींचे पूर्वज असून दैवतसुद्धा आहेत. समस्त आदिवासी समाजात त्यांच्याबद्दल आस्था आहे. मध्यप्रदेशात महात्मा रावण यांचे मंदीर असून महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हयातही त्यांचे मंदिर आहे. रामटेक व नागपूर जिल्हयातही रावणाची पूजाअर्चा केली जाते. परंतु हिंदू धर्मातील काही धार्मिक संघटना दसरा सणाच्या दिवशी आदिवासी राजा महात्मा रावण यांच्या पुतळ्याचे दहन करतात.

यांमुळे समस्त आदिवासी समाजाच्या व जनजातींच्या भावना दुखावल्या जात आहेत. आदिवासी जनतेमध्ये जाणूनबुजून आक्रोश निर्माण केला जात आहे. राजा महात्मा रावण यांच्या पुतळ्याचे दहन प्रथा बंद होणे गरजेचे आहे. तसे न केल्यास आदिवासी जनजातींद्वारे जनआक्रोश मोर्चा काढण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील असे निवेदनात नमुद केले आहे. त्याचप्रमाणे राजा रावण यांच्या पुतळ्याचे दहन करणाऱ्यांविरोधात भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम १५३ (अ) , २९५ (अ) व कलम २९८ नुसार व मुंबई पोलिस क्ट १३४ , १३५ नुसार फौजदारी गुन्हे दाखल करावे.अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदन देतेवेळी गोंडवाना कृती संघर्ष समीतीचे अध्यक्ष विकास मरसकोल्हे , उपाध्यक्ष दुर्गाप्रसाद परतेती , सचिव हरिप्रसाद वाडीवे , सहसचिव गजानन उईके , कोषाध्यक्ष घनश्याम कुंभरे तसेच महीला प्रतिनिधी प्रभाताई पेंदाम , तिजाबाई मरसकोल्हे , ममताबाई मरसकोल्हे , पूजा वाडीवे व प्रमिला कुसराम व सदस्यांपैकी रोशन सावतवान , राजकुमार वाडीवे , अशोक भलावी इ. उपस्थित होते.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सहकार्याने, लातूर पोलीस दलाच्या वतीने जादूटोणाविरोधी कायदा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन.

लातूर :– जादूटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार व प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समितीच्या सहकार्याने लातूर पोलीस अधीक्षक कार्यालयातील मीटिंग हॉलमध्ये प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेला अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, यांच्यासह महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रकाश घादगीने (राज्य कार्यकारी समिती सदस्य) नंदनी जाधव (राज्य कार्यकारी समिती सदस्य) वसंतराव टेकांळे (राज्य वैज्ञानिक जाणीव प्रकल्प) यांच्यासह लातूर जिल्ह्यातील पोलीस अधिकारी, अंमलदार व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे इतर सदस्य पदाधिकारी उपस्थित होते.



महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा उच्चाटन कायदा– २०१३ या कायद्याला महाराष्ट्र सरकारने संमती देऊन दहा वर्षे पूर्ण झाले निमित्त अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सहकार्याने आयोजित कार्यशाळेत पुणे येथील राज्य कार्यकारी समितीच्या सदस्या नंदनी जाधव यांनी नमूद कायद्यातील कलमे व परिशिष्टे बाबत मार्गदर्शन केले. जादूटोणा विरोधी संपूर्ण कायद्यातील कलमे सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आले.

तसेच सदर कार्यशाळेत उपस्थित असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी कायद्याची अंमलबजावणी करीत असताना आलेले अनुभव कथन केले .

# शाळा दत्तक योजना आणि कंत्राटी नोकर भरतीचा जी. आर.रद् करण्यासाठी फकिरा ब्रिग्रेडचे रास्तारोको आंदोलन








रेणापूर / प्रतिनिधी :– महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये तीन लाख पदांचा अनुशेष शिल्लक असतांना महाराष्ट्र शासनाने ६ सप्टेंबर २०२३ रोजी सर्व शासकीय विभागातील सरकारी नोक–यांचे कंत्राटीकरण केले, तसेच महाराष्ट्रातील ६४ हजार सरकारी शाळा, श्रीमंत भांडवलदार, व्यापारी, बिल्डर, उद्योगपतींना दत्तक देण्यासाठी १८ सप्टेंबर २०२३ रोजी शासनादेश काढून महाराष्ट्रातील गरीब, वंचित,मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचे आणि महसूल वाढवण्यासाठी दारूच्या दुकानांना मान्यता देण्याचे धोरण अवलंबल्याचे ,तसेच महाराष्ट्रातील विविध मंदिराना पर्यटन स्थळाचा दर्जा देऊन २४०० कोटी रूपये मंजूर करून एस.सी.एस.टी.ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना भीक मागायला लावण्याचे षडयंत्र हे तीनपाई सरकार करीत आहे. याचा निषेध करण्यासाठी फकिरा ब्रिगेडच्या वतीने रेणापूर, पिंळळफाटा, अंबाजोगाई–लातूर रोड येथे दिनांक २०ऑक्टोबर २०२३ शुक्रवारी दुपारी १२.०० वाजता रास्तारोको आंदोलन करण्यात आले .या आंदोलनात फकिरा ब्रिग्रेडचे प्रदेशाध्यक्ष श्रीरंग सरवदे,फकिरा ब्रिग्रेडचे जिल्हाध्यक्ष सचिन शिंदे,कार्याध्यक्ष संजय विरूळे, तालुका अध्यक्ष गोविंद धबडगे,बाळू पटनुरे , महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा निर्मला नवगिरे, नागिनी थोरात आदी कार्यकर्त्यांनी आपले विचार व्यक्त केले.श्रीरंग सरवदे पुढे म्हणाले की,

सध्या केंद्र आणि राज्यात मनुवादी विचारांचे सरकार सत्तेवर कार्यरत असून यांनी देश विकायला काढला आहे, राज्य सरकारला विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवायची नसून ग्रामपंचायत, महानगर पालिका, नगरपरिषदेच्या शाळांची मोक्याची जागा बळकावून ती बिल्डरांना द्यायची आहे,मोठ्या –मोठ्या ईमारती, मॉल्स उभे करायचे आहेत ,त्यामुळे या शाळा दत्तक देण्याचा घाट या मनुवादी सरकारने घातला आहे असा आरोप फकिरा ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष श्री.सरवदे यांनी केला या प्रसंगी संजय विरूळे म्हणाले की,सरकारने देशातील व महाराष्ट्रातील एस.सी,एस.टी,ओबीसी समाजातील विद्यार्थ्री, सुशिक्षित बेकार तरुणांच्या जीवाशी खेळण्याचा प्रयत्न केला आहे त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचे धोरण अवलंबले आहे.केंद्र सरकारने कौशल्य विकासाच्या नावाखाली या देशातील बलुतेदारी पध्दत, तसेच वर्णव्यवस्था,जातव्यवस्था कायम ठेवण्यासाठीच ही योजना सुरू केली आहे ,तर दुसरीकडे केंद्रात सचिव, उपसचिव, संचालक, उपसंचालक या सारख्या पदांवर सवर्ण समाजातील तरुणांची डायरेक्ट भरती केली जात आहे.या पदांना कंत्राटी पद्धत का लागू नाही ? असा प्रश्न उपस्थित करून .या मनुवादी सरकारचा खरा चेहरा देशातील जनतेसमोर आला आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य असून या राज्यांत मनुवाद्याचा डाव आम्ही हानून पाडू म.फुले यांनी इंग्रजाकडे सक्तीच्या शिक्षणाचा अग्रह धरला, राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले,नोक–यात आरक्षण दिले,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून १ते १४ वर्ष वयोगटातील मुलांमुलींना मोफत शिक्षणाची तरतूद केली ;परंतु आज या सर्व विचार,धोरणाला मूठमाती देऊन राज्यकर्ते योजना राबवत असल्याचे सिद्ध झाले आहे.याचा निषेध म्हणून आज रास्तारोको आंदोलन करण्यात आले आहे.या आंदोलनात..... फकिरा ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष श्रीरंग सरवदे, जिल्हाध्यक्ष सचिन शिंदे, .श्रीमती उर्मिला नवगिरे, जिल्हाध्यक्ष, महिला आघाडी,लातूर,श्रीमती नागिनी थोरात, उस्मानाबाद, संजय विरूळे, सतीश शिंदे, गोविंद धबडगे,सुरेकांत कदम,बाळू पटनुरे, जयदीप आगलावे,सुदर्शन शिंदे, मुकेश लोंढे, नाना लोंढे, ,अंगद कांबळे, लक्ष्मण खंडाळे, सुरेखा गायकवाड, सुभाष गायकवाड, विकास लोंढे, रमेश लोंढे, अंकुश कांबळे, दयानंद राऊत,राम उपाडे, विकास राऊत आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते

## २३ आठवड्यांच्या गर्भपाताचा महिलेस अधिकार

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाने पतीपासून विभक्त राहणा–या ३१ वर्षीय महिलेला २३ आठवड्यांच्या गर्भपाताची परवानगी दिली आहे. या प्रकरणावर सुनावणी करताना न्यायाधीश सुब्रमण्यम प्रसाद म्हणाले की, एम्सच्या वैद्यकीय मंडळाने गर्भ सामान्य स्थितीत असून त्याचा सुरक्षित गर्भपात केला जाऊ शकतो, असे मत व्यक्त केले आहे.या महिलेने पतीपासून घटस्फोटासाठी अर्ज केला आहे. तसेच तिला नव–यापासून होणारे मुलेही नको. मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी कायद्याच्या तरतुदीनुसार महिलेने कोर्टाकडे गर्भपाताची परवानगी मागितली होती. त्यानंतर न्यायालयाने एम्सला यासंदर्भात वैद्यकीय मंडळ स्थापन करण्यास सांगितले होते आणि गर्भपात महिलेच्या आरोग्यासाठी कोणत्याही प्रकारे हानिकारक आहे का, अशी विचारणा केली होती. गर्भपाताची परवानगी मागणा–या महिलेचा विवाह यावर्षी मे महिन्यात झाला होता. महिलेचे म्हणणे आहे की, तिला जूनमध्ये गर्भधारणेची माहिती मिळाली. पतीने शारीरिक, मानसिक आणि भावनिक छळ केल्याचा आरोप तिने याचिकेत केला. जुलैमध्ये तिने पतीवर शारीरिक अत्याचार केल्याचे याचिकेत म्हटले आहे. ऑगस्ट महिन्यात ती गरोदर असतानाही छळ सुरूच होता. त्यानंतर



पीडिता तिच्या आई–वडिलांच्या घरी आली.महिलेला निर्णय घेण्याचा अधिकार न्यायालयाने महिलेच्या पतीलाही याचिकेत पक्षकार केले होते. गुरुवारी झालेल्या सुनावणीदरम्यान तिला जूनमध्ये गर्भधारणेची माहिती मिळाली. पतीने शारीरिक, मानसिक आणि भावनिक छळ केल्याचा आरोप तिने याचिकेत केला. जुलैमध्ये तिने याचिकाकर्त्या महिला आणि तिचा पती, दोघेही न्यायालयात हजर होते. या संपूर्ण प्रकरणात उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला दिला, ज्यामध्ये असे म्हटले होते की, प्रत्येक महिलेला तिच्या आयुष्याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे. महिलेचा मानसिक छळ महिलेचे म्हणणे आहे की, पतीवर शारीरिक अत्याचार केल्याचे याचिकेत म्हटले आहे. ऑगस्ट महिन्यात ती गरोदर असतानाही छळ सुरूच होता. त्यानंतर पीडिता तिच्या आई–वडिलांच्या घरी आली.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयाचा हवाला गुरुवारी झालेल्या सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्या महिला आणि तिचा पती, दोघेही न्यायालयात हजर होते. या संपूर्ण प्रकरणात उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला दिला, ज्यामध्ये असे म्हटले होते की, प्रत्येक महिलेला तिच्या आयुष्याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे.

## रविंद्र वायकर यांना आर्थिक गुन्हे शाखेने चौकशीसाठी बोलावले

मुंबई : ठाकरे गटाचे नेते रवींद्र वायकर यांना मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेने समन्स बजावले आहे. दरम्यान त्यासाठी रवींद्र वायकर यांना २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता पोलीस मुख्यालयात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ५०० कोटींच्या कथित हॉटेल घोटाळ्याप्रकरणी रवींद्र वायकर यांना हे समन्स बजावण्यात आले. दरम्यान रवींद्र वायकर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना आपल्याला अशा कोणत्याही प्रकारचे समन्स आले नसल्याचे म्हटले आहे. तसेच जर कोणतीही समन्स आले तरी चौकशीला हजर राहणार असल्याचे देखील रवींद्र वायकर म्हणाले.जोगेश्वरी भूखंड आणि पंचतारांकित हॉटेल प्रकरणी रवींद्र वायकर यांच्यावर सप्टेंबर महिन्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान आर्थिक गुन्हे शाखेने हा गुन्हा दाखल केला होता.

# पानगाव येथे आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

लातूर :– देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या शुभहस्ते महाराष्ट्र राज्यातील ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन १९ ऑक्टोबर गुरुवार रोजी करण्यात आले. पानगाव येथील कार्यक्रम भाजपा नेते आ रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

तरुणांच्या रोजगार संधीसाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या अतिशय जिव्हाळ्याचा कौशल्य विकास असून गुरुवारी सायंकाळी राज्यातील ५११ कौशल्य विकास केंद्राचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. जीवन रेखा प्रतिष्ठान लातूर यांच्या वतीने रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे सुरू करण्यात येत असलेल्या कौशल्य विकास केंद्राच्या शुभारंभ कार्यक्रमास भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ एच व्ही वडगावे, रेणापूरच्या तहसीलदार श्रीमती धम्मप्रिया गायकवाड, गटविकास अधिकारी सुमित जाधव, तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी, भाजपाचे विधानसभा प्रमुख अनिल भिसे संगायो अध्यक्ष वसंत करमुडे, अभिषेक आकंनगिरे, सतीश आंबेकर, सुकेश भंडारे, व्यंकटराव अनामे मामा, भागवत गीते, अमर चव्हाण, दत्ता कस्तुरे, अनुसया फड, शिला आचार्य, ललिता कांबळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

ऑनलाइन उद्घाटन निमित्ताने पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी म्हणाले की, कौशल्य विकास प्रशिक्षण घेतलेल्या भारतीय युवकांची जगात मोठी मागणी असून शिक्षण आणि कौशल्य विकासातूनच सुख आणि यश मिळते. परिवाराबरोबरच देशाला खूप काही देता येते असे बोलून दाखविले तर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी कौशल्य विकास योजनेची माहिती देऊन छोट्या छोट्या उद्योजकांना बारा बलुतेदारांना प्रोत्साहित करण्याचा महत्त्वकांक्षी प्रकल्प असल्याचे सांगितले. पानगाव येथील कार्यक्रमातून बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळावे, स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी कौशल्य विकास हा मोदी साहेबांचा महत्वकांक्षी प्रकल्प राबविला जात आहे, त्याबद्दल मोदीजींचे आभार व्यक्त करावे तेवढे कमी असल्याचे सांगितले. प्रारंभी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजक मार्गदर्शन केंद्राचे दत्तात्रय कांबळे यांनी प्रास्ताविकातून प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत जीवन रेखा प्रतिष्ठानचे कृष्णा यादव, लातूर येथील महिला कॉलेजचे प्राचार्य संतोष त्रिमुखे यांच्यासह अनेकांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी तरुण ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE